
Special Issue
Part-02
January 2020

VIDYAWARTA®
Peer Reviewed International Refereed Research Journal

# "साहित्य, समाज आणि संस्कृती"



06

संपादक
प्रा.डॉ.औदुंबर जाधव

सहसंपादक
प्रा.पवार राजकुमार
प्रा.दत्ता सरगर



Scanned with OKEN Scanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता

श्री विद्या विकास मंडल संचलित

**श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगलवेढा**

(मराठी विभाग)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापुर विद्यापीठ, सोलापुर

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

## "साहित्य, समाज आणि संस्कृति"

**खंड २ - साहित्य आणि समाज चिंतन**

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with OKEN Scanner

48

# संतमेळ्यातील संत परीक्षक : संत गोरा कुंभार

डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी
मराठी विभाग,
शि.म.ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब जि.उस्मानाबाद

**********

**प्रस्तावना :-** वारकरी संप्रदायाचा उदय १२ व्या शतकात झाला असून आषाढी कार्तिकीची वारी करतो तो वारकरी. अशा वारकरयांचा जो पंथ तो वारकरी, आजचा भागवत धर्म.वैदिक धर्माचेच विकसित स्वरूप आहे. प्राचीन काळात या धर्माचा श्रीकृष्णाने पूनरुज्जीवन केले म्हणून गीतेतील तत्त्वज्ञान हे या धर्माचे तत्वज्ञान. मध्ययुगीन कालखंडांत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथातून पुंर्संघटन केले. याच ग्रंथास संप्रदायात श्रद्धाकेंद्र मानले जाते. राम- कृष्ण - हरी या मुलमंत्रातून संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर व नामदेव यांनी वारकरी संप्रदायाची बांधणी केली. विठ्ठल या दैवताभोवतीच श्रद्धा आणि जीवाच्या ठिकाणी ईश्वर असतो, तसेच पंढरी सहवास, चंद्रभागा स्नान व विठ्ठल दर्शन हेच या पंथाचे तत्वज्ञान आहे.

**उद्दिष्टे :-**

- संतमेळ्यातील संत गोरोबा कुंभार यांचे वारकरी संप्रदायातील योगदान समजून घेणे.
- आपल्या निवडक अभंगवाणीतून समाजाला केलेला उपदेश व भूमिका विचारात घेणे.
- संत गोरोबा कुंभार एक संत परीक्षक होते, ही बाब लक्षात घेणे.
- संत गोरोबा कुंभार आणि संत मेळ्यातील अनुबंध तपासून पाहणे.
- ईश्वरभक्तीचा मार्ग स्वीकारताना प्रपंचाला सांभाळूनच करावा. ही वृत्ती समजून घेणे..

**गृहितके:-**

- संत गोरोबा काकाचे श्रीसकलसंतगाथेत उपलब्ध झालेले २० अभंग दर्जेदार आहेत.
- दैनंदिन कष्ट व संघर्षातून गोरोबा काका यांनी ईश्वर भक्तीचा संदेश दिला आहे.
- संतमेळ्यातील त्याचे स्थान ज्ञानसंपन्न व जेष्टसंत म्हणून केलेले काम वाखाणण्याजोगे आहे.
- मराठवाडयाच्या मातीत जन्माला आलेले गोरा कुंभार यांचे योगदान अदितीय आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अभ्यासपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच प्राथमिक व दुय्यम साधन सामुग्री म्हणून प्रकाशित ग्रंथाचा उपयोग करण्यात आला आहे.

**विषय प्रवेश**

महाराष्ट्र भूमीला ही संत सज्जन, विद्वान थोर समाज सुधारक व कलावंतांची परंपरा मोठ्याप्रमाणात इतर प्रांतापेक्षा लाभली आहे. "जगाच्या कल्याणा संताची विभूती" या उक्तीप्रमाणे समाजाचे हित व्हावे या उदात्त हेतूने परंपरा सुरु झाली आहे. संत मेळ्यात विविध जाती धर्मातील संत सहभाग पाहायला मिळतो.संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई, चांगदेव, सावता माळी, संत नरहरी सोनार, चोखामेळा, कर्ममेळा, सेना न्हावी, परिसा भागवत, विसोबा खेचर, संत जनाबाई, संत जोगा परमानंद, संत दामाजी, संत तुकाराम आणि यांच्या समवेत ज्यांना मानाचे स्थान आहे, ते म्हणजे संत गोरोबा काका. या शतकातील सुरु झालेल्या भक्ती चळवळीस संतमेळा असे म्हणतात.

**जन्म व जन्मस्थळ :-**

संत गोरा कुंभार हे नामदेव समकालीन आहेत. प्रा. वेदकुमार वेदालंकर यांनी जन्म इ.स. १२६७ म्हणजे शालिवाहन शके ११८९ असे आपल्या संशोधनातून नोंदवले आहे. तसेच मराठी विश्वचरित्र कोश (संपा.) श्रीराम कामत आणि महादेवशास्त्री जोशी (संपा.) भारतीय संस्कृती कोश या ग्रंथात संत गोरा कुभार जन्म इ.स.१२६७ तेर ढोकी महाराष्ट्र, मृत्यु १३१७ अशीच नोंद उपलब्ध आहे.तसेच त्यांना अवघे पन्नास वर्षाचे आयुष्यमान लाभले.जन्मस्थलासंबधी उद्धवचिद्घन या ग्रंथात विवेचन करताना श्री ज.र.आजगावकर यांनी पुढील माहिती दिली आहे.

"बरवी संत चरित्र हो पावन परमपवित्र हो
सत्यपुरी जे पावन नागरी लोकी म्हणती तेर
संत परीक्षा करितो गोरा जातीचा कुंभार"

याच अनुषगाने मध्ययुगात सत्यपुरी म्हणजे आजची तेर नगरी.तेर-ढोकी असा उल्लेख आजमितीला करतात. हे गाव उस्मानाबाद जिल्ह्यात असून तसेच त्यांना गावात जमीनही इनाम मिळाली होती, तसेच जुने घरही इथे आहे, त्यांना परंपरागत कुंभारकीचा



Scanned with OKEN Scanner

व्यवसाय चालत असे, त्यांच्या घरासमोरील कडू लिंबाचे झाड होते, ते काही वर्षापूर्वी वादळात पडले अशी माहिती तेथील स्थानिक रहिवासी सांगतात. आज त्याच्या घरापासून काही अंतरावर समाधीस्थलाजवळ तेरणातीरावर भव्य असे मंदिर उभे आहे. एकूणच संत गोरा कुभार यांच्या जन्म व जन्मस्थळाविषयी अभ्यासकांत मतभेद नाहीत, ते तेर-ढोकी ता.जि. उस्मानाबाद येथीलच असल्याचे निर्विवाद सत्य आहे.

**बालपण व कौटुंबिक संस्कार :-**

गोरा कुंभार हे सत्याबा आणि सुमती यांचे एकुलते एक अपत्य वर्ण गोरा व शांत स्वभाव असल्याने त्यांचे नाव गोरा गोरोबा काका म्हणूनच संबोधतात. बालपणी हस्त मुख व खेळकर असल्याने त्याच्या बालपणावर प्रकाश टाकताना सदाशिव पाटील लिहितात-

बालपणी रांगत रांगत साधू पाहता गडबडा लोळत
हासत हासत कीर्तनी पळत लाघव करीत अपूर्व।।

संत गोरोबा यांच्या कुटुंबात पारंपरिक व्यवसाय कुंभारकीचा होता. वडिलाना त्यांच्या कामात मदत करीत, त्यामुळे त्याचे आई-वडील त्यांच्यावर अतिशय प्रेम करीत असत.

**विवाह व गृहस्थाश्रमात प्रवेश :-**

धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार हिंदू धर्मातील सोळा संस्कार व आचरणाप्रमाणे त्यांचा विवाह करण्याचे निश्चित झाले. तेर गावाजवळील असलेल्या ढोकी येथील सुसंस्कृत-गुणसंपन्न असलेल्या संती नावाच्या मुलीसोबत विवाह झाला. तद्नंतर कौटुंबीक जवाबदारी आणि दैनंदिन पारंपरिक व्यवसाय सांभाळला. याठिकाणी जबाबदारी न घेनार्या तरुणांना हा गुण घेण्यासारखा आहे. जसे महात्मा बसवेश्वर यांनी सांगितल्याप्रमाणे काम कवे कैलास (कामातच राम शोधा) या मुलमंत्राप्रमाणेच आपल्या कामातूनच विठ्ठल भक्ती करीत राहिले. या बाबतीत संत नामदेव लिहितात-

असे घराश्रमी करीत व्यवहार न पडे विसर विठोबाचा।।
कालवूनि माती तुडवित गोरा आठवीत वरा रखुमाईच्या।।
प्रेम अंगी असे झाकुनी नयन करीत भजन विठोबाचे।।

प्रपंचातून परमार्थ साधत असताना चिखल मळताना गाडगे तयार करताना विठ्ठल भक्ती करीत हाती चिपळ्या व आकाशाकडे पाहून नामस्मरण करीत असत.

**संत परीक्षक म्हणून भूमिका :-**

सर्व संत मंडळीत ज्ञान, वय व अनुभवाने जेष्ट संत म्हणून आदराने त्यांना काका संबोधत. या अनुषंगाने संत मंडळीतील भगिनी व योग मार्गातील ज्ञानदेवांच्या वाटसरू असणार्या संत मुक्ताबाई काकांविषयी परिचय करून देताना संत नामदेवांच्या अभंगाद्वारे सार्थ अभिप्रार्य नोंदवतात...

गोरा जुनाट पै जुने । हाती थापटने अनुभवांचे।।१।।
परब्रह्म म्हातारा निवाला अंतरी।
वैराग्याचे वारी पाल्हाळाला।।२।।
सोह शब्दे विरक्ती उरली अंवरी।
पाती अनुभरी पाहिले पण।।३।।
म्हणे मुक्ताबाई घालू द्या लोटांगण जाऊ द्या
शरण अन्याक्ताशी।।४।।

संत साहित्यात संत गोरा कुंभार यांचे श्री सकलसंतगाथेत एकूण २० विविध भाव-भावनांना स्पर्श करणारे अभंग समाविष्ट आहेत. त्यात विठ्ठल महिमा पर तीन, नाममहिमा दोन, उपदेशपर १५ असे दर्जेदार अभंग आहेत. आयुष्यभर विठ्ठल भक्तीलाच प्राधान्य दिले. संत नामदेवांना भक्तीचा गर्व झाला त्यांना विठ्ठल परब्रह्म हा केवळ माझ्यापाशीच आहे. इतरत्र नाही.या भक्ताला आपली खरी योग्यता प्राप्त झाली नव्हती, त्याला त्याची प्रचीती आली पाहिजे. हे ओळखून त्यांना गोरोबा काकांनी त्यांना

कच्चे मडके म्हणून उद्देशून म्हटले.हि जाणीव करून देणे म्हणजे एका अर्थाने ही परीक्षकाची भूमिका होती. त्यावेळी त्याच दर्जाचा असावा लागतो या अनुषंगाने संत मुक्ताबाई संत गोरोवा काकांना संत नामदेवांच्या अभंगातून म्हणतात....

कुलाल आपुल्या घरी भाजवी भाचरी म्हणे जे होईल हरी कृपावंत।।१।।
हरिसी वर्दळ लावितो निशिदिनी धाडीला म्हणोनी तुम्हापासी।।२।।
तुम्ही संत जन उद्धराल तत्काळ नामा लडिवाळ विठोबाचा ।।३।।
राखावे ते ब्रीद करावे पावन धाडा बोलवणे गोरोबाला ।।४।।
म्हणे मुक्ताबाई भाजले कि कोरे काकाचे उत्तर सत्य मानु।।५।।[६]

संत मेळ्यात परीक्षा झाली, कच्चे मडके अभिप्राय दिला मात्र नामदेवावर त्यांची अपर निष्ठा, श्रद्धा व प्रेम होते त्यांच्याविषयी मनात कमालीच कणव होती या संदर्भात भूमिका अभंगातून मांडतात...

कवन स्तुती करू कवणिये वाचे ओघ संकल्पाचे गिळिले चित्ते।।१।।
मन हे झाले मुके मन हे झाले मुके अनुभवाचे हे सुख हेलावले।।२।।
दृष्टीचे पाहणे परतले मागुति राहिली निवांत नेत्रापाती।।३।।
म्हणे गोरा कुंभार मौन्य सुख घ्यावे जीवे ओवाळावे नामियाशी।।४।।[४]

वारकरी संप्रदायात त्यांची परीक्षा घेतली जाते त्यात कोणताही श्रेष्ठ ठकनिष्ठ उच्च-नीच भावना, राग लोभ, मद-मत्सर असे भाव नसून मानवतावादी मूल्याची शिकवण तेच देतात, गोरोबा काका कसे होते त्यांच्या संदर्भात नामदेव अभंगातून माडतात...

"जव्हारीयेचे पुढे मांडियेले रत्न आता मोल उणे येईल कैसे

तैसे थापटने परखीयेचा हात वाफ झाल्या घात वाया जाती
प्रथम थापटने हाणीले निवृत्तीच्या माथा डेरा झाला निका परब्रह्म
तेची थापटने नामदेवावर डोई चोळू मोहरे रडो लागे
गोरा म्हणे कोरा राहिला गे बाई शूण्यभर नाही भाजिले कोटे।।"

**निष्कर्ष :-** संत गोरा कुंभार यांच्या जीवनात अनेक कटीण प्रसंग आले, पायाखाली चिखलात मुलगा तुडवला गेला, शपथेचा प्रसंग दुसरा विवाह, हात चाटणे, भजनात तल्लीन असताना हात फुटण्याचा प्रसंग अशा सर्व घटना पण त्यातून किंचितही विठ्ठल भक्तीची कास सोडली नाही जीवनभर नामस्मरण करीत राहिले. एकूणच त्यांचे साहित्य सामाजिक बांधिलकीचे तत्व विशद करणारे आहे. संत ज्ञानेश्वर, नामदेव प्रणीत शके ११७२-१२७२ या शंबर वर्षात अठरापगड जाती धर्मातून असंख्य संतांची श्रेणीच निर्माण झाली. जणू एकप्रकारे ते अध्यात्मिक लोकशाहीचे ते स्वरूप होते.

**संदर्भ :-**


- प्रा. वेदालंकार वेदकुमार, संत गोराकुंभार, विद्याभारती प्रकाशन, लातूर
- पाटील सदाशिव, सार्थ गोरोबा चरित्र, गुरुकृपा मुद्रणालय, लातूर
- जोशी महादेव शास्त्री (संपा.) भारतीय संस्कृती कोश, पुणे १९६५
- कामत श्रीराम पांडुरंग (संपा.) मराठी विश्वचरित्र कोश, गोवा १९७७
- ह.श्री.शेणोलीकर प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप व इतिहास, कोल्हापूर
- डॉ.बेळंबे गणेश मानवमुक्तीची चळवळ, २०१६


❑❑❑

**49**

# महाराष्ट्रातील भिल्ल या आदिवासी जमातीचा सामाजिक अभ्यास

प्रा. कोटगोंडे जी. एम.
श्री संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढा

**********

**प्रस्तावना:**

सातपुडा प्रदेश हा प्रामुख्याने भिल्ल प्रदेश म्हणून ओळखला जातो. सातपुडा पर्वताच्या रांगांमध्ये हा प्रदेश विखुरलेला आहे. गुजरात आणि मध्यप्रदेशातील पर्वतरांगांचा भाग सोडला तर सातपुडा पर्वताच्या रांगा महाराष्ट्रात अमरावती, धुळे, जळगाव आणि औरंगाबाद या जिल्ह्यांत पसरलेल्या आहेत. सातपुडा पर्वत रांगांमधील तापी व नर्मदा नद्या यांच्यामधील पहाडी प्रदेश व आजूबाजूचा सखल भाग व पर्वतमय प्रदेश भिलवाड या नावाने ओळखला जात होता. सातपुड्यापासून अरवली पर्वतांच्या रांगापर्यंत भिलवाड पसरलेला होता. प्रभू रामचंद्र जेव्हा दंडकारण्यात आले, तेव्हा त्यांना शबरी नावाची महिला भेटली होती. हे आपणास रामायणात ज्ञात आहे. त्या काळी या प्रदेशात राहणाऱ्या लोकांना शबर, किरात, निषाद या नावाने ओळखले जात असे. हे लोक दुसरे तिसरे कोणी नसून सातपुड्यातील भिल्ल होते. महादेवाने जिचे प्रियाराधन केले, अशा एका विलक्षण स्त्रीपासून त्यांची यांची वंशावळ सुरू झाली, अशी एक पारंपरिक श्रद्धा आहे. भिल्ल हे महाराष्ट्रातील भौगोलिक दृष्टीने महत्त्वाचे व संख्येने एक प्रमुख आदिवासी जमात आहे. भारतातील प्राचीन शिलालेखांत आणि प्राचीन साहित्यात भिल्लाचे उल्लेख सापडतात इतकी ही प्राचीन जमात आहे.

**उद्दिष्टे :**

महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील भिल्ल समाजाच्या सामाजिक व आर्थिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे

माहिती स्त्रोत व अभ्यास पद्धती: सदरील संशोधन लेख हा द्वितीय माहिती स्त्रोतावर अवलंबून असून विविध मासिके, संशोधन पत्रिका, इंटरनेट आणि विविध संदर्भग्रंथ इत्यादींचा आधार घेतलेला आहे.

**अभ्यासक्षेत्र :**

महाराष्ट्र हे भारतातील एक महत्त्वाचे राज्य असून भारताच्या दक्षिण भागात वसलेले आहे महाराष्ट्र राज्याचा अक्षवृत्तीय विस्तार १५४५' उत्तर ते २०६' उत्तर असून रेखावृत्तीय



Scanned with OKEN Scanner